# <u>नागपूर सुधार प्रन्यास</u>

## महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाअंतर्गत कार्यरत
## (महाराष्ट्र नागरी सेवा नियम लागू)

मुख्य कार्यालय, स्टेशन रोड, सदर, नागपूर

**(जाहिरात क्रमांक : आ.वि/स.से.भरती/२९६२/२०१५ दि. ०२/०६/२०१५)**

## <u>सहाय्यक विधी अधिकारी</u>

नागपूर सुधार प्रन्यास आस्थापनेत वरील पद वेतनश्रेणी रु. ९३००—३४८०० ग्रेड वेतन रु. ४४०० वर्ग—२ (गट—ब) चे रिक्त असलेले पद सरळ सेवा भरतीने भरावयाचे आहे. या करीता प्रस्तुत जाहिरातीत नमूद केलेल्या अटीची पूर्तता करणाऱ्या पात्र उमेदवाराकडून ऑनलाईन पध्द्तीने **ही जाहीरात प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसाचे आंत** अर्ज मागविण्यात येत आहे. याकरिता अर्ज करण्याची पध्दत, आवश्यक अर्हता, अनुभव, वयोमर्यादा, परीक्षा शुल्क, निवडीची सर्वसाधारण प्रक्रिया, परीक्षा योजना, अभ्यासक्रम इत्यादीबाबतच्या सविस्तर तपशीलासाठी मे. महाऑनलाईन लिमिटेडची अधिकृत वेबसाईट **maharecruitment.mahaonline.gov.in** पहावी. या अधिकृत वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आलेली माहिती व जाहिरात अधिकृत समजण्यात यावी.

स्वा

**सभापती**

नागपूर सुधार प्रन्यास

## <u>पात्रतेच्या अटी व शर्ती</u> :– वयोमर्यादा व अर्हता

१) वकील, अटर्नी किंवा अधिवक्ता यांचे करीता उमेदवाराचे वय ०१/०४/२०१५ रोजी २१ वर्षापेक्षा कमी आणि ३५ वर्षा पेक्षा जास्त नसावे. हे उमेदवार विधी शाखेतील पदवी आणि उच्च न्यायालयातील किंवा त्यास दुय्यम असलेल्या न्यायालयातील वकील, अटर्नी किंवा अधिवक्ता म्हणून किमान तीन वर्षाचा अनुभव असणे आवश्यक आहे.

अ) नविन विधी पदवीधारकाकरीता उमेदवाराचे वय ०१/०४/२०१५ रोजी २१ वर्षापेक्षा कमी आणि २५ वर्षापेक्षा जास्त नसावे. तसेच हे उमेदवार विधी शाखेतील पदवी व सनदधारक असावे. सदर पदवी प्राप्त करण्यासाठी घेण्यात येणारी प्रत्येक परीक्षा प्रथम प्रयत्नात किमान ५५ टक्के गुणांसह उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

ब) उच्च न्यायालयाच्या तसेच या न्यायालयास दुय्यम असलेल्या लिपीक वर्गीय कर्मचारी वर्गाचे सदस्य

क) मंत्रालयाचे विधी व न्याय विभागाच्या विधी विभागामध्ये विधी सहाय्यक वा त्यापेक्षा वरिष्ठ पदावर काम करणांऱ्या कर्मचारी वर्गाचे सदस्य

ड) उच्च न्यायालय, शहर दिवाणी न्यायालय आणि जिल्हा न्यायालय यामधील सरकारी वकीलांच्या कार्यालयांतील लिपीक वर्गीय कर्मचारी वर्गाचे सदस्य व शासकीय पात्रताधारक कर्मचारी (वरील ब, क, ड) या सर्व उमेदवारांचे वय २१ वर्षापेक्षा कमी व ४५ वर्षापेक्षा जास्त नसावे. तथापि, विधी पदवी प्राप्तीनंतर दि. ०१/०४/२०१५ पर्यत त्यांनी किमान ३ वर्षाची सेवा केलेली असणे आवश्यक आहे

२) मागासवर्गीय उमेदवारांबाबत उच्चतम वयोमर्यादा ५ वर्षापर्यंत शिथीलक्षम राहील.

३) प्रस्तुत पदासाठी उपरोक्त सर्व गटातील उमेदवार हे (वर्ग १०) एस.एस.सी. परीक्षा मराठी विषय घेवून उत्तीर्ण असणे किंवा त्यांना मराठी भाषा उत्तम रितीने बोलता, वाचता, लिहिता येणे आवश्यक आहे. तसेच मराठीतून इंग्रजीत व इंग्रजीतून मराठीत भाषांतर करता येणे आवश्यक आहे. उमेदवारास वर्ग १० वी मराठी विषय घेऊन उत्तीर्ण नसल्यास, याबाबतचे प्रमाणपत्र संबंधित जिल्हयाचे मुख्य न्यायाधीश तसेच नविन विधी पदवीधरांकरीता विधी अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या महाविद्यालयाचे प्राचार्य किंवा विद्यापीठाचे विभाग प्रमुख यांचेकडून प्राप्त करावे लागेल. तसेच उमेदवाराची निवड झाल्यानंतर एतदर्थ मंडळाची मराठी भाषाविषयक परिक्षा २ वर्षात उत्तीर्ण करणे आवश्यक राहील.

४) उमेदवार महाराष्ट्र राज्याचा सर्वसाधारण रहिवासी असणे आवश्यक आहे. याबाबत शासनाने प्राधिकृत केलेल्या सक्षम अधिकाऱ्याचे रहिवासी प्रमाणपत्र (Domicile Certificate) जोडावे लागेल. सरकारी खाती/महामंडळे इत्यादीमध्ये नोकरी करणाऱ्या व्यक्तींनी आपल्या विभागामार्फत अर्ज विहीत मुदतीत सादर करावा.

५) उमेदवारांनी सदर पदाकरीता विहित केलेल्या नमुन्यात पासपोर्ट फोटोसह परिपुर्ण अर्ज आवश्यक शैक्षणिक व इतर अनुषंगिक सर्व साक्षांकित प्रमाणपत्रासह <u>**ही जाहीरात प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसाचे आंत**</u> मे. महाऑनलाईन लिमिटेडची अधिकृत वेबसाईट **maharecruitment.mahaonline.gov.in** यांना <u>**ऑनलाईन पध्दतीने पाठवावे.**</u> या मुदतीनंतर आलेल्या अर्जाचा विचार केल्या जाणार नाही. अपुर्ण/चुकीचे अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

६) आवेदनपत्रासोबत महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम २००५ मधील तरतूदीनुसार सोबत जोडलेल्या विहित नमून्यात प्रतिज्ञापन व प्रतिज्ञापत्र देणे आवश्यक आहे.

७) अर्जदाराला लेखी परीक्षा/मुलाखतीसाठी उपस्थित राहण्याकरीता कुठल्याही प्रकारचा भत्ता अनुज्ञेय राहणार नाही.

८) अर्ज केलेल्या पात्र उमेदवारांची **वर्णनात्मक (conventional) स्वरुपाची लेखी परीक्षा** घेतल्या जाईल. ही परीक्षा २०० गुणांची असून प्रत्येकी १०० गुणांचे दोन पेपर राहतील. या परीक्षेकरीता किमान ५० टक्के गुण (खुल्या गटाकरीता) व ४५ टक्के गुण (मागासवर्ग) गटाकरीता मिळवणारे उमेदवार मुलाखतीस पात्र ठरतील. वरील लेखी परीक्षा वर्णनात्मक स्वरुपाची असल्याने उमेदवाराचे उत्तर पत्रीकेवर विहित जागेशिवाय त्याची ओळख पटविणारे काही संकेत चिन्ह (उदा.नाव, बैठक क्र.,दुरध्वनी क्र.) आढळल्यास त्याची उत्तर पत्रीका रद्द करण्यात येईल.

९) वरील गुणवत्ता प्राप्त पात्र उमेवारांची ५० गुणांची वैयक्तिक मुलाखत घेण्यात येईल. यात किमान ४० टक्के गुण प्राप्त करणाऱ्या उमेदवाराचा अंतिम निवडीसाठी विचार होईल. लेखी परीक्षा व मुलाखतीमध्ये प्राप्त केलेल्या एकुण गुणांच्या आधारे उमेदवारांची अंतिम निवड करण्यात येईल.

१०) निवड होणाऱ्या उमेदवारास नियुक्ती दिल्यानंतर नविन परिभाषित अंशदान निवृत्ती योजना लागु राहील.

११) लेखी परीक्षेच्या कालावधीत नक्कल/गैरवर्तणूक केलेल्या किंवा फौजदारी केसेसमध्ये शिक्षा झालेल्या किंवा न्यायिक सेवेतुन सक्तीने सेवानिवृत्त केलेल्या/काढून टाकलेल्या/बडतर्फ केलेल्या उमेदवाराचा अर्ज पात्र ठरविला जाणार नाही. अर्जासोबत जोडलेले शैक्षणिक अर्हता व इतर आवश्यक दस्तावेज/प्रमाणपत्रे तपासणीअंती नकली किंवा खोटे आढळल्यास त्याची झालेली निवड/नियुक्ती रद्द करण्यात येईल. तसेच संबंधीत उमेदवारावर फौजदारी कार्यवाही करण्यात येईल. तसेच चरित्रविषयक पोलीस अहवाल असमाधानकारक आल्यास त्याची झालेली निवड नियुक्ती प्रक्रियेच्या कुठल्याही टप्प्यावर रद्द करण्याचे अधिकार मा. सभापतींना राहील. व निवड सूचीतील पुढील उमेदवाराचा गुणवत्तेनुसार निवडीसाठी विचार करण्यात येईल.

१२) उमेदवाराने दि. ०१/०४/२०१५ पर्यत संपादन केलेली अर्हता व अनुभव सदर पदासाठी पात्रता व पुढील निवडीसाठी विचारात घेण्यात येईल.

१३) सहाय्यक विधी अधिकारी या पदावर निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्तीच्यावेळी सदर पदावर तीन वर्ष कार्यरत राहणार आहे, याबाबतचे रू. २,००,०००/— एवढया रक्कमेचे बंधपत्र लिहून देणे आवश्यक राहिल.

१४) वरील पदासाठी उमेदवाराची झालेली निवड/नियुक्ती ही तात्पुरत्या स्वरूपाची तसेच सदर पदाचे शासन मान्यतेच्या अधिन राहून राहील. तसेच ही नियुक्ती संपुष्टात आणण्याचे सर्वाधिकार मा. सभापती यांना राहतील.

१५) परीक्षा शुल्क —उमेदवारांनी खालीलप्रमाणे परीक्षा शुल्काचा भरणा नेट बॅकींग/सीएससी/स्टेट बॅक ऑफ इंडिया ई—चालानद्वारे करावा. अन्यथा उमेदवाराचा अर्ज विचारात घेतला जाणार नाही.

**अ. अमागास प्रवर्गासाठी — रू. ३००/—**
**ब. मागास प्रवर्गासाठी — रू. १५०/—**

सभापती
नागपूर सुधार प्रन्यास